# तलवाडा गावात महापुरुषांचे पुतळे पण परिसरात बिनधास्त सुरू दोन नंबरचे धंदे!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## तलवाडा पोलिसांची डोळेझाक; आता जिल्ह्याचे एसपी नवनीत कॉवत काय पाऊल उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष?

# पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर साहेब, झोपीचे सोंग घेऊन महापुरुषांच्या पुतळ्याजवळ अवैध धंद्यांना मोकळे रान केले का?

## महापुरुषांचे पुतळे केवळ सौंदर्यवर्धनासाठी की सामाजिक भान जागवण्यासाठी? या प्रश्नाचे उत्तर पोलीस प्रशासनाने कृतीतून द्यावे?

गेवराई । प्रतिनिधी

गावात अभिमानाने उभारले गेलेले छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही अण्णाभाऊ साठे या महापुरुषांचे तीन भव्य दिव्य पूर्णाकृती पुतळे हे तलवाड्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वैभवाचे प्रतीक आहेत. मात्र या पुतळ्यांच्या सान्निध्यातच खुलेआम सुरू असलेले अवैध धंदे ही गावासाठी लज्जास्पद बाब ठरत आहे. विशेष म्हणजे हे सगळं होत असतानाही संबंधित तलवाडा पोलिसांकडून मात्र याकडे प्रचंड दुर्लक्ष केलं जात असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून उमटत आहे. गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी आणि जनतेच्या नजरेसमोर असलेल्या या पुतळ्यांच्या आजूबाजूला जुगार, मटका, अवैध दारू विक्री यांसारखे गैरकृत्ये सुरु असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि काही सजग नागरिकांनी याबाबत पोलिस ठाण्यात तक्रारी करूनही कारवाईचा अभाव जाणवतो. महापुरुषांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याऐवजी त्यांच्या पुतळ्यांच्या छायेतच अशा समाजबाह्य कृत्यांना खतपाणी घालणं ही दुर्दैवी गोष्ट आहे. पोलिस प्रशासनाचा याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष असल्याचा आरोप होत असून, संबंधित पोलिस कर्मचारी कोणाच्या संरक्षणाखाली काम करत आहेत का? असा सवाल देखील विचारला जात आहे. ग्रामस्थांनी या पार्श्वभूमीवर तात्काळ कारवाईची मागणी करत, अन्यथा व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. आता प्रशासन आणि पोलीस विभाग हे सामाजिक प्रतिष्ठेचे प्रश्न गांभीर्याने घेतात का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.







विशेष म्हणजे या सगळ्या प्रकाराकडे तलवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर हे झोपेचे सोंग घेऊन गप्प बसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. गावातील प्रमुख चौकात, जनतेच्या नजरेसमोर आणि महापुरुषांच्या पुतळयांच्या सान्निध्यात सुरू असलेल्या मटका, जुगार, अवैध दारू, आणि अन्य गैरधंद्यांमुळे गावाची प्रतिमा मलिन होत आहे. या ठिकाणी वारंवार वर्दळ असूनही पोलिसांच्या कारवाईचा मागमूसही नसल्यामुळे पोलीस आणि स्थानिक अवैध धंदेवाल्यांमध्ये कुठला 'समजुता करार' झालाय का? असा संशय नागरिकांमध्ये व्यक्त केला जात आहे. पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांच्याकडे या प्रकारांची माहिती असूनही कारवाई का होत नाही? हा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे. महापुरुषांचे पुतळे केवळ सौंदर्यवर्धनासाठी की सामाजिक भान जागवण्यासाठी? या प्रश्नाचे उत्तर पोलीस प्रशासनाने कृतीतून द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.





### पुतळ्याजवळचे अवैध धंदे उघड; पोलीस निरीक्षक झोपलेत, आता पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत काय कारवाई करणार?

गावाच्या विकासाची आणि सामाजिक सजगतेची ओळख म्हणून उभे असलेले महापुरुषांचे पुतळे सन्मानाचे प्रतीक असताना, त्याच पुतळ्यांच्या आसपास दोन नंबरचे अवैध धंदे बिनधास्त सुरू आहेत. विशेष म्हणजे या प्रकाराकडे तलवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर हे जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पुतळ्यांभोवती निर्माण झालेली अराजकता आणि कायद्याचे उल्लंघन हे पोलिसांच्या निष्क्रीयतेचे प्रतिक ठरत असून, अनेकदा तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. आता संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेतली जाते का, हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या दृष्टीने ही मोठी जबाबदारी आहे. एकीकडे पोलीस निरीक्षक झोपेचे सोंग घेत असताना, दुसरीकडे जिल्ह्याच्या सर्वोच्च पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणात कोणती भूमिका घेतली जाते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि युवक मंडळांनी याबाबत कठोर कारवाईची मागणी केली असून, अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतः लक्ष घालून या अवैध धंद्यांना आळा घालावा अशी जनतेची ठाम मागणी आहे.

## गंगावाडी खून प्रकरणातील आरोपीची बीड कारागृहात रवानगी







तलवाडा । प्रतिनिधी


प्रेम प्रकारातून शिवम शिकणे यांना पाच जणांनी मिळून मारहाण केली होती त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर तलवाडा पोलिसात गुन्हाच गुन्हा नोंद करण्यात आला यातील पाचही आरोपी तलवाडा पोलिसांनी पकडले. त्यांना रविवार रोजी गेवराई येथील न्यायालयासमोर उभे केले असता कोर्टाने त्यांची बीड कारागृहात रवानगी केली.

गेवराई तालुक्यातील गंगावाडी येथील शिवम चिकाने या तरुणास गावातीलच एका तरुणी सोबत प्रेम संबंध असल्याचा संशय घेऊन मुलीचे वडील, भाऊ यांच्यासह इतर तीन मुख्य आरोपी यांनी बेदम मारहाण केली होती, मारहाणीनंतर शिवम यास प्रथम गेवराई येथील व तेथून जेजे रुग्णालयात छत्रपती संभाजी नगर याठिकाणी उपचारासाठी नेण्यात आले होते, परंतु मारहाण मोठ्या प्रमाणात झाली असल्याने उपचारादरम्यान शिवम चिकाने यांचा मृतू झाला. या प्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात अगोदर मारहाणीचा तर मृत्यू

पान २ वर

## बीड शहरातील एका धोकादायक गुंडाची हर्सुल कारागृहात रवानगी

### एसपी नवनीत कॉवताचा एमपीडीएचा दणका सुरूच



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातीलकायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्हयाचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन एमपीडीए कायद्या अंतर्गत बऱ्याच



गुन्हेगारांवर व गुंडावर तसेच वाळुमाफीया व जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या व्यक्तीवर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक, बीड यांचे सुचनेवरुन पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ पोलीस ठाणे बीड शहर यांनी दिनांक १४.०६.२०२५ रोजी इसम नामे सोहेल खाँन समद खाँन वय २७ वर्षे रा. जुनी भाजीमंडई बीड ता. जि. बीड याचे विरुद्ध एमपीडीए कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे बीड शहर येथे खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे, गंभीर दुखापत करणे, जबरी चोरीकरणे, जिवे मारण्याची धमक्या देणे, शिवीगाळ करणे, गैरनिरोध करणे, वगैरे स्वरुपाचे

पान २ वर



## आंतरजिल्हा घरफोडी व चोऱ्या करणारी टोळी जेरबंद

**०३ घरफोडया केल्याचे उघड; स्थानिक गुन्हे शाखा बीड कामगिरी**

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी बीड जिल्हयामध्ये होणाऱ्या घरफोडया उघड करण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या त्या अनुषंगाने घरफोडी करणाऱ्या आरोपींचा शोध सुरु होता. जानेवारी महीण्यामध्ये पोलीस ठाणे बर्दापुर हद्दीत एकुण तीन ठिकाणी घरफोडया झालेल्या होत्या. त्या घरफोडया करणाऱ्या आरोपींचे नांवे तांत्रिक बाबींचा आधारे उघड

पान २ वर

# अंबाजोगाई तालुक्यात विविध योजनेतंर्गत पं.स. व जि.प. बां. उपविभागामार्फत बोगस व निकृष्ट दर्जाचे कामे

बीड । प्रतिनिधी

आर.वी. काळे उपअभियंता जि.प.बां. उपविभाग अंबाजोगाई हे मागील २०-२५ वर्षापासुन अंबाजागाई येथेच कार्यरत असल्यामुळे त्यांनी बाजोगाई तालक्यातील विविध कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. मौ मांडवा पठाण ता. अंबाजोगाई जि. बीड या गावामध्ये पंचायत समिती व बांधकाम उपविभागामार्फत विविध विकास कामे करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये सुतारगल्ली ते बिडवे वस्ती या रस्त्याचा समावेश आहे. परंतु सदर गुत्तेदाराने बोगस सिमेंट वापरल्यामुळे सदर व रस्त्यामध्ये नदीचे गोटे भरल्यामुळे रस्ता पूर्णपणे तुटला आहे.

सदर कामामध्ये गत्तेदाराने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला असुन त्यात शाखा अभियंता हे सुध्दा या भ्रष्टाचारामध्ये सहभागी आहेत त्यांनी वेळीच सदर कामात लक्ष न दिल्याने गुत्तेदाराने सदर रस्त्याच्या कामामध्ये डको सॅन्ड न वापरता डस्टचा वापर केलेला आहे संबंधित दिल्याने व दिरंगाई केल्याने तसेच गुत्तेदाराशी आर्थिक संबंध ठेवून कामाकडे दुर्लक्ष केलेले असुन शासनाची फसवणुक केलेली आहे. सदर गावात विकासाच्या कामाखाली संबंधित गटविकास अधिकारी, उपअभियंता, शाखा अभियंता मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करीत आहेत. तसेच सदर गावातील ग्रामसेवक हे सुध्दा या भ्रष्टाचारात सामील आहे.. आम्ही असेच बोगस कामे करतो. व पर्ण तालुक्यात बोगस कामे करतो, तुला काय करायचे ते कर बोलतात. यांना सदर कामाबाबत विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देवुन सदर कामे आमच्याकडे नसुन पंचायत समितीकडे आहेत.

तुला काय करायचे ते कर, माझे हात वरपर्यंत आहेत. या कामाचा आणि आमचा काहीही संबंध नाहीं. तु न्यायालयात जा, किंवा सीओ कडे जा, पालकमंत्र्याकडे जा, किंवा मुख्यमंत्र्याकडे जा किंवा नरेंदी मोदी पंतप्रधान कडे जा. आम्ही काहीही कार्यवाही करु शकत नाही. आमच्याकडे बरेच अर्ज आले आणि गेले. मी मंत्र्याचा पी.ए. राहिलेला माणुस आहे, माझी सर्वाची ओळख आहे. माझी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमितशाह यांची सुध्दा ओळख आहे. मी कोणालाच भित नाही. मी आजपर्यंत असेच बोगस अहवाल दिलेले आहेत तुझ्याकडे कितीही पुरावे असतील तर माझे काहीच वाकडे होत नाही, तुला कोठे जायचे तेथे जा. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मी देत नसतो. असे कितीही अर्ज येतात जातात मला तेवढेच काम आहे का, तु न्यायालयात जा कोठेही जा, माझ्या ऑफीसला कितीही वेळा आलात तरी मी अहवाल देत नसतो असे मला उप-विभागीय अधिकारी अंबाजोगाई पं. स., अंबाजोगाई ९१/०२ आवक लिपीक धमकावून बाहेर हाकलून दिले. सदरील कामे हे चौकशी अधिकारी आर.बी. पत्की यांनीच केलेले असुन त्यांनाच चौकशी करण्याचे आदेश श्री. काळे उपअभियंता, जि.प. बां. विभाग अंबाजोगाई यांनी दिले. ज्या अधिकाऱ्याने भ्रष्टाचार केला त्याच अधिकाऱ्यास चौकशी दिल्यास तो खरा अहवाल कसा देईल.



सर्व विभागाला निवेदन दिले असून कारवाई करण्याची मागणी केली आहे. सदर कामाचा तपास उपअभियंता यांनी करायला हवा होता. परंतु ते सुध्दा या भ्रष्टाचारात सहभागी असल्यामुळे चौकशी साठी छ. संभाजीनगर येथील चौकशी अधिकारी नियुक्त करण्यात यावा, जेव्हा चौकशी अधिकारी येतील त्यावेळेस अर्जदारास कळविण्यात यावे, सदर प्रकरणास एक वर्षाचा कालावधी उलटुन देखील व मा. कार्यकारी अभियंता, जि.प. बां. विभाग के ०२ यांनी व मा. उपविभागीय अधिकारी उपविभाग अंबाजोगाई यांनी सुध्दा सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेशित केलेले असतांनासुध्दा उपअभियंता जि.प. बां. उपविभाग अंबाजोगाई यांनी कसल्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. सदर काम हे भ्रष्टाचार करण्याच्या हेतूने आपसात संगनमत करुन कामे झालेली आहेत. त्यामुळे संबंधित कनिष्ठ अभियंता आर.बी. पत्की यांनी सदर काम नित्कृष्ट दर्जाचे असतांनासुध्दा सदरील कामे ही व्यवस्थीत व सुस्थित असल्याबाबत दिनांक ०६.०६.२०२५ रोजी त्यांचा अहवाल दिलेला आहे. जो पुर्णपणे चुकीचा व बनावट आहे. अर्जदाराकडे सदर काम नित्कृष्ट झाल्याबाबतचे फोटो उपलब्ध आहेत. ते यासोबत सादर करण्यात येत आहेत.

श्री. आर.बी. पत्को कनिष्ठ अभियंता जि.प. बां. उपविभाग यांनी अशाच प्रकारे संपूर्ण तालुक्यात बोगस कामे केलेली असुन काही ठिकाणी कामे न करताच बीले उचलली आहेत याची सुध्दा चौकशी करण्यात यावी. तसेच त्यांना पाठीशी घालणारे व भ्रष्टाचारात सामील असणारे श्री. काळे उपअभियंता जि.प. बांधकाम उपविभाग अंबाजोगाई यांचीसुध्दा चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, मा. उपअभियंता जि.प. बां. उपविभाग अंबाजोगाई, गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबाजोगाई, संबंधित ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता पत्की आर.बी., संबंधित रोजगार सेवक हे सदर प्रकरणात सामील असल्यामुळे ते सदर कामाची चौकशी करु शकत नाही, त्यांना वारंवार सदर कामाबाबत विचारणा केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. तमुळे आपल्या स्तरावरुन चौकशी समिती नेमण्यात यावी व सदर कामाची क्वालिटी कंट्रोल मार्फत चौकशी करण्यात यावी व संबंधित गुत्तेदाराचे बिल अदा करण्यात येवू नये. व सदर गुत्तेदाराचे लायसन हे रद्द करण्यात यावे. तसेच सदर प्रकरणी संबंधित गटविकास अधिकारी, शाखा अभियंता व ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता आर.बी. पत्की, संबंधित रोजगार सेवक यांना दोषी धरुन त्यांच्या पगारातुन सदर रक्कम कपात करण्यात येवुन त्यांची चौकशी करुन शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी त्यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे. अशी मागणी साहेबराव हरिभाऊ जोगदंड यांनी केली आहे.



# जिया शेख यांच्यातर्फे पि.के. अण्णा पाटील विद्यालय येथे पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रम

नेकनूर । प्रतिनिधी

नेकनुर येथील पि.के. अण्णा पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रम संपन्न झाला. शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप विद्यार्थ्याला खाऊ वाटप, तसेच वृक्ष लागवड करण्यात आले. वृक्षारोपणाचा कार्यक्रम विद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. यामध्ये शिक्षक विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिकांची लक्षणीय उपस्थिती बघण्यास मिळाली. कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी व तयारीसर्व शिक्षक गण तसेच वर्ग १ते १० वि च्या विद्यार्थी यांनी पार पाडली.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी आपल्या हाताने एका झाडाचे रोपण केले. तसेच यानंतर विद्यालयाच्या सभागृहामध्ये कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी झाडाचे महत्व आणि पर्यावरणामध्ये झाडाचे अनन्य साधारण महत्व कसे आहे, यावर भाषण दिले त्यांनी भाषणातून झाडे लावा झाडे जगवा असा संदेश सर्वांना दिला. तसेच विद्यालयाचे जिया सर यांनी सुद्धा झाडाचे महत्व यावर भाषण दिले. आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम व्यवस्थित पणे पार पडला म्हणून सर्वांचे अभिनंदन सुद्धा केले तसेच,प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे अशी सर्वांना त्यांनी विनंती आपल्या भाषणात केली.

या कार्यक्रम प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सालगुडे सर कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राथमिकचे मुख्याध्यापक शिंदे सर हे होते, तसेच प्रमुख पाहुणे, भोसले सर काळे सर, जगताप, करंडे सर, मोरे सर, मिरगे मॅडम, खोसे मॅडम, विश्वास शिंदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायाळ मॅडम यांनी केले आभार प्रदर्शन काळे सर यांनी केले. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी कार्यक्रमाचा छान आयोजन जियाभाई शेख यांनी केले.




कडा - श्रावण महिना निमित्त आज महेश मंदिर कडा येथे मा.राहुल जालिंदर कर्डिले यांच्या स्वखर्चातून ओम नम: शिवाय नाव बसवण्यात आले.

## भाऊ-बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे भावार्थ रामायण अरण्य कांड ग्रंथ रोज सुरू

बीड । प्रतिनिधी



श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बालेपीर बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष १८वे.राष्ट्र संत भगवानबाबा जयंती निमित्त.२५ जुलै ते १३ ऑगस्ट पर्यंत रोज नियमित भावार्थ रामायण 'अरण्य कांड हा ग्रंथ सुरू केलेला आहे. रोज रात्री ८ ते १० यावेळेत ग्रंथाचे अतिशय सुंदर असे अर्थासह वाचन होत आहे.

या ग्रंथाचे सुचक ह भ प कचरू म.चव्हाण व ह भ प संतोष म.राऊत आहेत व वाचक ह.भ.प.उतम म.दोडके, ह.भ.प.दतायत्र म.बांगर आहेत. या ग्रंथाचा श्रवणाचा लाभ परिसरातील भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजन व श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र भाऊ सानप व त्यांचे सर्व सहकारी यांनी केले आहे.

# नवनिर्वाचित युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

सिरसाळा । प्रतिनिधी

नुकतेच युवासेना विधानसभा प्रमुखपदी निवड झालेले कैलास कावरे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथराव शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देत पुढील कार्यासाठी आशीर्वाद दिले.

कैलास कावरे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की मी एका सर्वसामान्य कुटुंबातून आलेला कार्यकर्ता असून उपमुख्यमंत्रीपदावर विराजमान असलेला आणि शिवसेनेचे मुख्य नेते असलेला नेता माझ्यासारख्या खेड्यातल्या कार्यकर्त्याला सहजपणे भेटतो, हेच माझ्यासाठी मोठं भाग्य आहे. मी काही कमावलं असेल, तर ते हे प्रेम आणि आशीर्वाद आहेत. दरम्यान, साहेबांनी मला काम करत राहा, लोकांच्या सेवेत राहा असा प्रेरणादायी संदेश दिला. आजवर शिवसेनेमध्ये केलेल्या कार्याची पावती मला या रूपाने मिळाल्याचं समाधान आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कैलास कावरे हे विधानसभाप्रमुख पदाच्या निवडीनंतर ते पक्षश्रेष्ठींचे आभार मानण्यासाठी विशेषत: उपमुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी गेले होते. त्यांच्यातील नम्रता, कार्यनिष्ठा आणि जनसेवेची तळमळ लक्षात घेता, स्थानिक तसेच पक्षपातळीवर त्यांचे कौतुक होत आहे.



पान १ वरून...

## गंगावाडी खून प्रकरणातील आरोपीची बीड कारागृहात रवानगी

झाल्यानंतर गुन्हाच गुन्हा दाखल करण्यात आला होता. या पाच आरोपी पैकी सुरुवातीला तीन आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आले होते व नंतर दोन आरोपी पकडण्यात आले या आरोपींना न्यायालयासमोर हजार केल्या नंतर त्यांना प्रथम पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती.

दरम्यान आरोपीची कसून चौकशी करून यामध्ये अजून कोणाचा सहभाग आहे का याचा तपास पोलिस करत असून दिनांक २७ जुलै रोजी या आरोपींना न्यायालयासमोर हजार केले असता न्यायालयाने या पाच हि आरोपींची कारागृहात रवानगी केली आहे. याप्रकरणी अधिक तपास सपोनी मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय स्वप्नील कोळी, कैलास अन्नलस, बिट अंमलदार काकडे हे करत आहेत.

## बीड शहरातील एका धोकादायक गुंडाची हर्सुल कारागृहात रवानगी

०७ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०५ गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहेत. सदरील इसम हा बीड शहरात भाजीमंडई बशीरगंज, सुभाष रोड, बलभीमचौक, कारांजा, राजुरीवेश वैगेरे भागात दादागिरी करुन सर्वसामान्य लोकांना विनाकारण त्रास देत होता. तसेच शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे करत होता. त्यामुळे पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती. सदर इसमावर यापुर्वी त्याने त्याची वर्तणुक सुधारावी व चागंले वागावे यासाठी इछडड कलम १२९ अन्वये दिनांक ३०.०९.२०२४ रोजी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानतापुन्हा चढत्या क्रमाने गुन्हेकरण्याचे चालुच ठेवुन होता. त्याची बीड शहरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्याससमोर येत नाहीत.

सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक २६.०७.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्मुलकारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध करणे बाबत आदेशीत केले. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पो.नि.श्री. शितलकुमार बल्लाळ पो.स्टे. बीड शहर व पोनि श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा बीड यांना दिल्या होत्या. त्यावरुन पोनि शिवाजी बंटेवाड यांनी गोपणीय खबऱ्याच्या आधारे माहीती काढुन पोउपनि श्री सिध्देश्वर मुरकुटे यांचे पथक बीड शहरात रवाना करुन त्यांचे मार्फतीने सदर इसमास दिनांक २६.०७.२०२५ रोजी ताब्यात घेतले व पोलीस ठाणे बीड शहर येथे दिनांक २६.०७.२०२५ रोजी २०.३० वा हजर केले व त्यानंतर पोनि बीड शहर यांनी सदर इसमास योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २७.०७.२०२५ रोजी ०२.३० वा. हजर करुन स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविपोअ बीड , पो.नि.श्री. शिवाजी बंटेवाड, स्थागुशा बीड, यांचे मार्गदर्शना खाली पो.नि श्री. शितलकुमार बल्लाळ, सपोनि बाबा राठोड, पो.ह सचिन अलगट, महादेव दराडे, गणपती राऊत पो.स्टे बीड शहर व बीड स्थागुशा चे पोउपनि श्री सिध्देश्वर मुरकुटे, सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोना अंकुश वरपे युनुस बागवान, अश्पाक सय्यद, मनोज परजणे, बिबिसेन चव्हाण यांनी केली आहे. भविष्यातही धोकादायक गुंड व वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुचा काळाबाजार करणारे व्यक्ती, मटका जुगार खेळणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरीकरणाऱ्या व खंडणी बहाद्दर गुंडावर जास्तीत जास्त एम.पी.डी.ए. कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

## आंतरजिल्हा घरफोडी व चोऱ्या करणारी टोळी जेरबंद

झालेली होती परंतु आरोपी मिळुन येत नव्हते, दिनांक २६.०७.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप् बातमीदारामार्फत् माहीती मिळाली की बर्दापुर येथे घरफोडी करणारे आरोपी हे माने कॉम्प्लेक्स बीड येथे थांबलेले आहेत.

पोनि/श्री बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी सदरील आरोपी पकडण्यासाठी मार्गदर्शन करुन पथक रवाना केले व पथकाने झडप मारुन आरोपींना पकडले. त्यांची नांवे १)शेख ईरफान मुनीर, वय २१ वर्ष, २) मुस्तफा कासिम पठाण, वय २७ वर्ष, दोन्ही रा.अंबेकडकर चौक,पानगांव ता.रेणापुर जि.लातुर असे आहेत. त्याचे कडे गुन्हा संदर्भाने चौकशी केली असता त्यांनी बर्दापुर येथे जानेवारी महीण्यामध्ये मौजे गिरवरी, जवळगाव व बर्दापुर येथे बंद असलेल्या घरामध्ये चोरी करुन सोने व पैसे घेवुन गेल्याची व घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. त्याचे कडुन पोलीस ठाणे बर्दापुर येथील एकुण ०३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असुन आरोपीना पुढील तपासकामी पोलीस ठाणे बर्दापुर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सपोनि/ससाणे, प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे बर्दापुर हे करीत आहेत.

सदरील आरोपी हे कुख्यात दरोडेखोर व चोऱ्या करणारे पोलीस अभिलेखावरील आरोपी असुन त्याचे वर यापुर्वी विमानतळ पोलीस ठाणे नांदेड येथे ०३ गुन्हे, नांदेड ग्रामीण येथे ०१ गुन्हा, रेणापुर येथे ०१ गुन्हा, परळी ग्रा येथे ०१ गुन्हा असे चोरी व दरोडया सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस हवालदार, विकास राठोड, राहुल शिंदे, नितीन वडमारे, पोलीस अंमलदार आशपाक सय्यद, मनोज परजणे, नारायण कोरडे, सर्व स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केलेली आहे.

# ना.लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचा निष्ठावंत कार्यकर्ता : गणेश लांडे

## पंकजाताई मुंडे यांच्यावरील निष्ठा आणि सामाजिक कार्यांची ठसठशीत ओळख

गावाकडच्या मातीशी नाळ जोडलेला, जनतेच्या सुख-दुखात कायम सहभागी असलेला, आणि नेत्या बद्दल असलेल्या निष्ठेचा आदर्श उभा करणारा कार्यकर्ता म्हणजे गणेश लांडे.

गणेश लांडे यांनी राजकारण म्हणजे केवळ निवडणूक नसून सामाजिक जबाबदारी आणि लोकसेवा ही खरी ओळख असते, हे आपल्या कामातून वेळोवेळी सिद्ध केले आहे. विशेषत: पंकजाताई मुंडे यांच्याबद्दल असलेले त्यांचे निस्सीम प्रेम, अटळ निष्ठा आणि अढळ विश्वास यामुळे ते आज हजारो तरुण कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरले आहेत.

**९ सेवा पंधरवडा - एक सामाजिक चळवळ**

पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी घेतलेला सेवा पंधरवडा उपक्रम म्हणजे केवळ औपचारिकता नव्हती, तर एक लोकाभिमुख चळवळ होती. गणेश लांडे यांनी बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये स्वत: उपस्थित राहून शालेय साहित्य वाटप, कापडी पिशव्या, वृक्षारोपण, रक्तदान, जनावरांसाठी लसीकरण कॅम्प, शेतकऱ्यांना नॅनो युरिया वाटप यांसारख्या उपक्रमांतून ग्रामीण भागात परिवर्तनाची बीजे पेरली. गावोगावी जिल्हा परिषद शाळांमध्ये जाऊन मुलांना वही-पेन नाही, तर साक्षरतेचे भविष्य दिले.





**९ पाणी आणि पर्यावरणासाठी समर्पित कार्य**

पंकजाताई मुंडे यांनी जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सोशल मीडियावरून सर्व नद्यांची स्वच्छता करा असे जनतेला आवाहन केले होते. या आवाहनाला खऱ्या अर्थाने प्रतिसाद देत, गणेश लांडे यांनी बीड शहरातील बिंदुसरा नदी तीन दिवस, दोन जेसीबीच्या सहाय्याने पूर्णपणे स्वच्छ केली. हा उपक्रम नुसता प्रतीकात्मक नव्हता, तर पर्यावरणाबद्दलची खरी बांधिलकी आणि झपाटलेले नेतृत्व दर्शवणारा होता.

**नेतृत्वासाठी लढणारा कार्यकर्ता**

२०२४ लोकसभा निवडणुकीनंतर पंकजाताई मुंडे यांचा पराभव झाला तेव्हा अनेकांनी शांत राहणे पसंत केले. पण गणेश लांडे मात्र गप्प राहिले नाहीत. ताईंना मंत्रिपद मिळाले पाहिजे! या मागणीसाठी त्यांनी बॅनर लावून थेट वरिष्ठ नेतृत्वाकडे लोकभावना पोहोचवल्या. ही केवळ राजकीय मागणी नव्हती - ती होती एका कार्यकर्त्याची आपल्या नेत्या बद्दलची खरी, खोल, आणि स्पष्ट असलेली भावना.

**खरी निष्ठा - गाजत नाही, वाजते**

गणेश लांडे यांची निष्ठा ही नारा, पोस्टर किंवा घोषणा यापुरती मर्यादित नाही. ती आहे कामामधून व्यक्त होणारी सच्ची भावना. पंकजाताईंना मंत्रीपद मिळाल्यावर त्यांनी ३ क्विंटल पेढे वाटले, आणि आमदारकीचे तिकीट मिळाल्यावर ४००० नारळ फोडून आशीर्वाद मागितले - ही भक्ती अंध नसून जिवंत श्रद्धेची उधारण होती.

**जनतेचा माणूस, मातीशी जोडलेला नेता**

शेतकऱ्याला मदत, मुलांना शिक्षण, पर्यावरण रक्षण, जनावरांचे आरोग्य, आणि नेत्याच्या भविष्याची काळजी - ही बहुआयामी लोकसेवा गणेश लांडे यांचं वेगळेपण दाखवते. ते नेहमी कार्यकर्त्यांमध्येच नाही, तर गावकऱ्यांच्या मनामध्येही आपली जागा निर्माण करतात.

**शब्दांच्या पलीकडची निष्ठा - गणेश लांडे**

गणेश लांडे हे फक्त पंकजाताईंचे कार्यकर्ते नाहीत, तर ते भविष्यातील राजकीय परिवर्तनाचे सक्षम शिल्पकार ठरू शकतात. कारण ज्याच्या मनात काम आहे, निष्ठा आहे, आणि जनतेची जाण आहे - त्याच्यातच पुढचा नेता दडलेला असतो!

**समद शेख**

# जाणीव

जाणीव असावी नात्यांची,
आई-वडिलांच्या प्रेमाची, मेहनतीची, अथक परिश्रमाची
त्यांनी पाहिलेल्या आपल्यासाठींच्या स्वप्नांची
कष्टांचे दार उघडूनी जग जिंकण्याची..
जाणीव असावी शाळेच्या घंटेची,
भविष्य घडवणाऱ्या पहिल्या पायरीची.
तिथेच उगम होतो सद्विचारांची अन् स्वप्नांची..
तिथेच शिकतो माणूसपणाच्या माणूसकीची ..
जाणीव असावी गुरूंच्या मंत्राची अन् शिकवणूकीची,
अन् शिकवणुकीतून दिलेल्या संस्काराची..
त्यांच्या प्रत्येक शब्दाशब्दांतून दिलेल्या ज्ञानाची.. तिमिरातून ही वाट शोधून
देतात आयुष्याच्या, भवितव्याच्या प्रकाशाची...
जाणीव असावी समाजाच्या साथीची
आपल्यासाठी वाहिलेल्या त्या वाटेची।
त्याग, मदतीच्या ओंजळी कधी नाही विसरायची
उत्तरदायित्वाचे भान सदैव धरून ठेवण्याची
जाणीव असावी निसर्गाच्या सृष्टीची,
पानगळीतील सौंदर्य,पावसाच्या नांदीची।
हिरव्या दुनियेचं ऋण न विसरण्याची ..
तिच्या रक्षणाची शपथ मनाशीच घेण्याची
आणि
जाणीव असावी स्वतःच्या शक्तीची,
आत्मविश्वास, श्रद्धा अन् योग्यतेची
आपल्यातच आहे सामर्थ्याने आत्मविश्वासाने आपल्याला आणि जगाला
बदलण्याची.. हो ना...!



**श्रीमती देशमुख पी.के.**
**जि .प. प्रा शा. माली पारगाव..**

# दिंद्रुड पोलिस ठाण्याचे युवराज श्रिडोळे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

## सामंजस्याने मुळे - गडदे यांचा शेतीचा वाद मिटवला



दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील उमरी येथील मुळे व शिंदेवाडी येथील गडदे यांचा शेतीचा वाद गेल्या दोन महिन्यांपासून सुरू होता. हा वाद गावातील प्रतिष्ठित, सामाजिक, राजकीय, पत्रकार लोकांनी थेट बांधावर जाऊनही मिटवू शकला नव्हता. मात्र, दिंद्रुड पोलिस ठाण्याचे श्रिडोळे यांनी बुधवार रोजी थेट बांधावर जाऊन दोन्ही शेतकऱ्यांना सामंजस्याने समजावत वाद नको म्हणून कोणावरही अन्याय न करता मुळे व गडदे यांचा वाद थेट बांधावरच मिटवला. त्यामुळे दोन्ही शेतकऱ्यांत समाधान निर्माण झाले असून, दिंद्रुड पोलिसांचे कौतुक होत आहे.

उमरी शिवारातील गट क्रमांक २२२ येथे कुंडलिक गीताराम मुळे यांची वडिलोपार्जित १० एकर जमीन होती. त्यातील ५ एकर जमीन पाटबंधारे विभागाने भूसंपादन केली होती. उर्वरित ५ एकर जमीन त्यांनी महादेव गडदे यांना विक्री केली होती. ही ५ एकर जमीन गडदे गेल्या २० वर्षांपासून कसत होते. मात्र, गडदे यांना आपल्याला जमीन कमी आहे असे वाटू लागल्याने त्यांनी शासकीय मोजणी फीस भरून जमीन मोजणी केली. मोजणी दरम्यान मुळे यांच्या भूसंपादित जमिनीतील थोडा भाग मोजणीत निघाल्याने वाद सुरू झाला.

कुंडलिक मुळे यांच्या पाच एकर जमिनीपैकी दोन एकर जमीन कॅनॉलच्या खोदकामात गेली, मात्र उर्वरित तीन एकर जमीन ते मूळ मालक म्हणून गेल्या दहा वर्षांपासून कसत होते. मात्र, भूसंपादित जमिनीवर गडदे यांनी ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे वाद निर्माण झाला. या वादाबाबत शिंदेवाडी, उमरी येथील प्रतिष्ठित, सामाजिक लोकांनी थेट बांधावर जाऊनही वाद मिटवण्याचा प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी झाला नव्हता.

शेवटी कुंडलिक मुळे यांचे भाऊ राजेभाऊ मुळे यांनी माझ्या भूसंपादित जमिनीवर मूळ मालक या नात्याने मला ती जमीन कसता येते यासंदर्भात सांगितले. तसेच, मी त्या जमिनीवर कापूस लागवड केली होती, ती गडदे यांनी ट्रॅक्टरच्या साहाय्याने मोडून त्या ठिकाणी सोयाबीन पेरली व माझ्या पिकाचे नुकसान केले, अशी तक्रार दिंद्रुड पोलिस ठाण्यात दिली.

या तक्रारीची दखल घेत दिंद्रुड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक महादेव ढाकणे यांनी पोलीस ठाण्याचे युवराज श्रिडोळे यांना थेट बांधावर जाऊन हा वाद मिटवा, असा आदेश दिला. आदेश मिळताच युवराज श्रिडोळे यांनी उमरीचे तंटामुक्त अध्यक्ष रामभाऊ घायतिडक, पत्रकार वैजनाथ घायतिडक, पाटबंधारे विभागाचे पांडे ,विजय केळगन्द्रे पो.ह. (चालक) यांना सोबत घेऊन थेट बांधावर जात दोन्ही शेतकऱ्यांना सामंजस्याने समजावून, कोणावरही अन्याय न करता दोन महिन्यांपासून सुरू असलेला वाद जागेवरच मिटवला. त्यामुळे दोन्ही शेतकऱ्यांत समाधान निर्माण झाले असून, दिंद्रुड पोलिसांचे शिंदेवाडी व उमरी येथील शेतकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

> “ शेतीचा वाद हा महसूल विभागाचा असतो, तरी आम्ही माणुसकीच्या नात्याने व शेतकऱ्यांमध्ये वाद होऊ नये म्हणून आणि जिल्हा अधीक्षक साहेबांच्या ‘पोलीस थेट बांधावर’ या आदेशानुसार मी कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय न होता प्रत्यक्ष बांधावर जाऊन वाद मिटवला.
>
> – **युवराज श्रिडोळे,** दिंद्रुड पोलिस ठाणे
>
> “ गावातील शेतकऱ्याचे किंवा इतर काही वाद असतील तर गावातच मिटवले जातात मात्र काही वाद हे पोलिसांना सोबत घेऊनच मिटवावे लागतात म्हणून प्रत्यक्ष थेट बांधावर जाऊन पोलिसांच्या सहकाऱ्यांनी आम्ही मुळे व गडदे यांना समजावून सांगून हा वाद बांधावरच मिटवला.
>
> **–रामभाऊ घायतिडक,** तंटामुक्त अध्यक्ष, उमरी



# ग्रामीण भागातील समस्या आणि भ्रष्टाचारावर सखोल चर्चा : आम्रपाली साबळे

## आ. नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांचा बीड जिल्हा दौरा

बीड । प्रतिनिधी

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबईचे अध्यक्ष व कॅबिनेट मंत्री दर्जाचे आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी बीड जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी बीड शहरासह विविध गावांतील समस्या जाणून घेतल्या.या वेळी बीड जिल्हा व ग्रामीण भागातील नागरिकांनी ग्रामपंचायतींमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचारावर तसेच मूलभूत सुविधांच्या अभावावर आवाज उठवला. अनेक गावांमध्ये रस्त्यांची दयनीय अवस्था असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, याकडे नागरिकांनी लक्ष वेधले. या भेटीत अन्याय अत्याचार भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बीड जिल्हा अध्यक्षा सौ. आम्रपाली साबळे यांनी आमदार पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केली. त्यांनी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार, ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणातील अडथळे, तसेच राज्य सरकारकडून दुर्लक्षित होत असलेला ग्रामीण महसूल यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर माहिती दिली.या समस्यांची गंभीर दखल घेत, आ. पाटील यांनी मी माझ्या पद्धतीने सर्व कामे करणार आहे आणि ग्रामीण भागातील अन्याय, अत्याचार, व भ्रष्टाचार दूर करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, असा ठाम शब्द दिला.या दौऱ्यात विविध सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. पाटील यांचा दौरा हा बीड जिल्ह्यातील जनतेसाठी आश्वासक ठरला असून लवकरच या संवादाचे सकारात्मक परिणाम दिसतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विजय सोनवणेच्या ॲट्रॉसिटी व अपहरण प्रकरणातील आरोपी नेकनूर पोलिसांच्या आशीर्वादाने मोकाट

बीड । प्रतिनिधी

नेकनूर पोलीस स्टेशन अंतर्गत विजय सोनवणे यांच्यावर बारा दिवसापूर्वी पाठीमागून येऊन साखळी त्याचा वापर करत गंभीर जखमी केले होते. व जाती वाचक शिवागाव अपर्णाची धमकी देण्यात आली होती. ॲट्रॉसिटी व अपहरण अंतर्गत गुन्हा दाखल झाला व अमाणूसपणे मारहाण करणाऱ्या आरोपी तेजस अशोक मांडवे, आदित्य अशोक मांडवे यांना तात्काळ अटक अटक करून कायद्याचा वचक बसवावा.

आरोपी हे राहणार मसेवाडी ता.जि. बीड याठिकाणी स्वतःचे ट्रॅक्टर घेऊन गावात गुंडपणा करतात राजकीय दबाव टाकतात तसेच जेष्ठ व्यक्ती तसेच अन्य लोकांना अरेरावीची भाषा वापरतात. मागील दि. १६/०७/२०२५ रोजी त्यांनी गावातीलच विजय सोनवणे या रिक्षाचालक युवकाण बेसावध असताना लोखंडी चैनने डोक्यात मारुन टाकण्याच्या विचाराने मारहान केली तसेच त्यास जातीवाचक शिवीगाळ केली त्याच्या आईस व पत्नीस धमकी दिली आणि हे सर्व करुनही नेकनूर पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. आणि ते आरोपी गावात मोकाट फिरत आहेत, काही आरोपी सोनवणे जीवे मारण्याचा धमक्या देत आहेत. घटनेची सत्यता तपासुन तसेच गांभीर्य लक्षात घेऊन यावर लक्ष द्यावे, अशी मागणी पोलीस अधीक्षक नवनीत त्यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.




> नेकनूर पोलीस योग्य तपास करत नसल्याने समाजसेविका आम्रपाली साबळे व सोनवणे यांच्या कुटुंबीयांनी बीड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट घेण्याचा प्रयत्न केला. परंतु भेट झाली नाही लवकरच भेट घेणार असले चे सांगितले आहे. सोनवणे कुटुंबात झालेल्या अन्याय अत्याचार मानवतेला काळीमा फासणार आहे. त्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाहीत असे आम्रपाली साबळे यांनी सांगितले आहे.

# भुरभुर पावसात विद्युत पुरवठा दिवसभर खंडित : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी



बीड शहरात व ग्रामीण भागात महावितरण कडून नागरिकांना दिवसभर विद्युत पुरवठा पासून वंचित राहावे लागत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस चालू आहे आणि भुरभुर पाऊस सुरू झाला की बत्ती गुल अशी परिस्थिती शहरात व ग्रामीण भागात झालेली आहे. उन्हाळ्यापेक्षाही भयानक गर्मी पावसाळ्याच्या वेळी होते, आणि अशात लाईट केल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणाच्या भोंगळ कारभाराविरुद्ध कोणीही नेता बोलायला तयार दिसत नसल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी दिसून येत आहे.

पावसाळ्याचे दिवस आहे व मोठा पाऊस आणि वारा सुटला तर वीस पुरवठा खंडित होणे समजण्यासारखे आहे परंतु भूर भूर पाऊस झाला तरी, शहरातील प्रत्येक भागातील वीज पुरवठा खंडित होत आहे आणि एक दोन तास नव्हे तर पाच ते सहा तास वीजपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांना प्रश्न पडत आहे की, लोडशेडींग तर चालू नाही. लाईट नसल्यामुळे घरगुती कामामध्ये तसेच व्यापाऱ्यांनाही मोठा फटका बसत असल्याचे दिसून येत आहे. वीज महावितरणाच्या या गलथान कारभाराविरुद्ध खासदार तसेच आमदार पण काही बोलला तयार दिसून येत नाही. माझी अजित दादा पवार उपमुख्यमंत्री तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांना विनंती आहे की, त्यांनी महावितरणाच्या अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात व नागरिकांची नाराजी दूर करावी.




# दत्ताभाऊ वाघमारे सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या नि:स्वार्थ भावनेतून अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळते : आ.पंडित

## दत्ताभाऊंच्या अनोख्या संकल्पनामुळे आमदारांचे डोळे पाणावले

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे आमदार विजयसिंह पंडित आमदार व्हावेत म्हणून माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस अमरसिंह पंडित यांचे कट्टर समर्थक दत्ताभाऊ वाघमारे यांनी विजयसिंह पंडित हे बजरंगबली चे कट्टर भक्त असल्याने श्रावणच्या पहिल्या शनिवारी जर विजयसिंह पंडित आमदार झाले तर मनोभावातून श्रावणच्या पहिल्या शनिवारी महापंगत देऊन बजरंगबलीचे पूजन आमदाराच्या हस्ते करू असं साकडं बजरंग बलीला घातलेलं होतं आणि त्या निमित्ताने येत्या श्रावण शनिवारी सकाळी ११ वाजता नवस आमदाराच्या हस्ते फेडण्यात आला. गेवराई विधानसभा मतदारसंघातून २०२४ ला आमदार व्हावेत यासाठी जातेगाव येथील बजरंगबलीला कार्यकर्त्याने केलेला संकल्प आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते शनिवार (दि.२६) रोजी जातेगाव येथील बजरंगबली ची पूजा करुन पूर्ण केला.

यानिमित्ताने स्वत:च्या जीवाची पर्वा न करता नेत्यावर जीवापाड प्रेम करणारा कार्यकर्ता आणि कार्यकर्त्याला जीवापाड जपणारा नेता असा अनोखा संगम पाहावयास मिळाला. यातून नवस, निष्ठा आणि नवसपूर्ती या कार्यकर्त्यांच्या समर्पणाला आ. विजयसिंह पंडित यांची अनोखी साथ मिळत असल्याचे दिसून आले. गेवराई तालुक्यातील जातेगाव येथील माजी आमदार अमरसिंह पंडित कट्टर समर्थक निष्ठावान कार्यकर्ते व आ. विजयसिंह पंडित यांच्यावर प्रेम करणारे दत्ताभाऊ वाघमारे यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आ. विजयसिंह पंडित आमदार व्हावे यासाठी बजरंग बलीच्या नवसाचा संकल्प करून नवस केला होता.

यावेळी कार्यकर्त्यांचे अतूट प्रेमातून भावनिक झालेल्या वातावरणामुळे आ. विजयसिंह पंडित देखील भावनाविवश झाले होते. लोकशाहीत अशा प्रकारची निष्ठा दुर्मिळ मानली जाते. स्वत:च्या जीवावर उदार होऊन काम करणारे कार्यकर्ते राजकारणात फार कमी वेळा भेटतात. कार्यकर्त्यांकडून अशी निष्ठा आणि प्रेम मिळणं हे माझं भाग्य आहे व त्याचबरोबर माझ्यासाठी भावनिक आणि अभिमानाची बाब आहे. कार्यकर्त्यांची अशी नि:स्वार्थ भावना मला अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा देते. मी अतिशय तारुण्य वयात राजकारणात आलो. स्वाभिमानी युवा बिग्रेडच्या माध्यमातून युवकांची फळी मजबूत केली आणि जिल्हा परिषद यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदारसंघाचा सदस्य या पदापर्यंत प्रवास करण्यासाठी माझ्या जीवाला जीव देणारे कार्यकर्ते माझ्यासोबत होतें सातत्याने माझा विजय खेचून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी तन–मन–धनाने काम केला आहे.

कार्यकर्ता हा नेत्याचा सर्वस्व असतो कार्यकर्त्याच्या बळावर नेता उच्च पदावर विराजमान होतों सामान्य कुटुंबातील शेतकरी पुत्राने माझ्यासाठी नवस केला आणि या कार्यकर्त्याच्या निष्ठावंत व जीवापाड प्रेमामुळे आमदार महोदयांचे भाषण करताना डोळे पाणवले या कार्यकर्त्याच्या निष्ठेने मला भारावून टाकले असून जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या या विश्वासामुळे माझ्यावरची जबाबदारी आणखी वाढली आहे. मी माझे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी ही श्रद्धा माझ्यासाठी प्रेरणास्थान असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले.

# वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम संत सावता महाराजांनी केले : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

साडेसातशे वर्षापासून प्रवाहित असलेल्या वारकरी संप्रदायाने समाजातील अनेक दोष दूर केले. माणसातली जळमटे दूर केली. समाजातील जातीभेद, हिंसा, द्वेष, भेदाभेद दूर करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले असून वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम संत सावता महाराजांनी केले असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. बीड येथील नव्याने उभारलेल्या श्री संत शिरोमणी सावतामहाराज मंदिर स्थळी ते दर्शनासाठी आले असता ट्रस्टींनी शहरातील प्रमुख लोकांना एकत्रित बोलावून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा संवाद कार्यक्रम घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदिराचे जेष्ठ ट्रस्टी नामदेवराव दुधाळ हे होते.




यावेळी ह.भ.प.अरुण डाके, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास बडगे, गणपत डोईफोडे, पत्रकार दिलीप ख्रिस्ती, नगरसेवक शुभम धूत, बाबुराव दुधाळ, विशाल घाडगे, दादासाहेब मुंडे, ॲड.सतिश शिंदे आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकाराम महाराजापर्यंत आणि त्यानंतरही वारकरी संप्रदायाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. सर्व संतांमध्ये श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे वारकरी संप्रदायामध्ये कार्य अधिक महत्त्वाचे आहे. सावता महाराजांनी वारकरी संप्रदायात कर्म अर्थात कर्तव्याला अधिक महत्त्व आहे हे निक्षुण सांगितले. प्रपंचातून देखील परमार्थ साधता येतो. केवळ परमार्थासाठी यज्ञ, याग, तप करणे जरुरीचे नाही हे सांगितले. समाज कर्म प्रधान बनवला. कर्म हाच धर्म असे सांगून माणसाला क्रियाशील बनवण्याचे काम सावता महाराजांनी केले. वारकरी संप्रदायाला व्यवहार्य बनविण्याचे काम सावता महाराजांनी केले. प्रपंच करून परमार्थ साधता येतो आणि परमार्थ म्हणजे शुद्ध अंतकरणाने केलेले नामस्मरण.अशा नामस्मरणामुळे माणसाचे अंतकरण शुद्ध होते आनंदी होते आनंद म्हणजेच धर्म होय. इतकी सुस्पष्टता वारकरी संप्रदायांमध्ये सावता महाराजांनी आणलेली आहे असे ते म्हणाले.

याप्रसंगी दादासाहेब मुंडे, मोहन गोरे, अध्यक्ष नामदेव दुधाळ यांची समायोजित भाषणे झाली. मंदिराला वस्तू रूपाने विशेष देणगी दिलेल्या दानशुरांचा सत्कार यावेळी करण्यात आला. सुरुवातीला मंदिरात सावता महाराजांची आरती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते झाली. यावेळी समाज बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्यामसुंदर घाडगे यांनी केले.



# धनगरवाडी कडून माने वस्तीकडे जायला व्यवस्थित रस्ता नाही

## स्थानिक सरपंच, ग्रामसेवक यांचे दुर्लक्ष, सर्वसामान्य जनतेचे हाल : हनुमंत लकडे



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील धनगरवाडी या गावातून जवळच असलेल्या माने वस्ती कडे जायला रस्ता नाही, गेल्या अनेक वर्षापासून हा रस्ता होत नसल्याचा संतप्त ग्रामस्थांचा आरोप आहे. या वस्तीकडे जायला म्बुलन्स ला सुद्धा जायला रस्ता नाही, कधीकाळी या रस्त्यावरून पेशंट डोक्यावर आणण्याची वेळ ग्रामस्थांवर येत आहे. शाळेची बस जात नाही. यावेळी या गावचे विद्यमान सरपंच करतात तरी काय असा सवाल यावेळी ग्रामस्थ करीत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये ग्रामस्थ आंदोलन करण्याची तयारीत असल्याचा इशारा या गावचे सामाजिक कार्यकर्ते हनुमंत लकडे यांनी दिला आहे.

# जोपर्यंत चंद्र सूर्य तारे आहेत तोपर्यंत पाकिस्तान भारताचा मारच खाणार : आ.धस

## त्रिदल संघटनेच्या वतीने कारगील विजय दिनानिमित्त तिरंगा यात्रेचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

गेली ७५ वर्षापासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान भारताच्या कुरापती काढत आला आहे. घुसखोरी करून आलेल्या दहशतवाद्यांना प्रत्येक वेळी त्यांना भारतीय जवानांनी प्रत्युत्तर देऊन अगोदर केवळ निषेध व्हायचा परंतु आता पाकिस्तानात घुसून मारण्यात येत आहे. आज संपूर्ण देश सुरक्षित आणि बिनधास्त राहात आहोत ते फक्त भारतीय जवानांमुळेच.. त्यामुळेच जोपर्यंत चंद्र सूर्य तारे आहेत तोपर्यत पाकिस्तान भारताचा मारच खाणार आहे पाकिस्तानने कधीही भारताच्या नादी लागू नये, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.

कारगील विजय दिनाच्या औचित्याने आष्टी शहरात सैनिक सेवा संघ मुख्यालय बीड जिल्हा व त्रिदल संघटनेच्या वतीने भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झाला यावेळी प्रमुख मार्गदर्शक करताना आ. सुरेश धस बोलत होते. यावेळी कारगील युद्धात शहीद झालेले पाटोदा तालुक्याचे सुपुत्र शहीद सुभाष सानप यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर अभिनेते तथा व्याख्याते विक्रम जगताप, अभय धोंडे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, त्रिदल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे, अशोक भोसले, सुनील रेडेकर यांचेसह सह त्रिदल संघटनेचे पदाधिकारी, व्यापारी, पत्रकार, विद्यार्थी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले, ३ मे १९९९ रोजी सुरू झालेल्या या युद्धात भारतीय लष्कराने ‘ऑपरेशन विजय’ अंतर्गत ८५ दिवसांच्या संघर्षानंतर २६ जुलै १९९९ रोजी टायगर हिलवर तिरंगा फडकवून विजय प्राप्त केला. या लढ्यात ५२७ भारतीय जवानांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. यामध्ये कॅप्टन विक्रम बत्रा, लेफ्टनंट संदीप उन्नीकृष्णन, ग्रेनेडियर योगेंद्र सिंह यादव यांसारख्या वीरांनी अतुलनीय शौर्य गाजवले.याच युद्धात पाटोदा तालुक्यातील शहीद सुभाष सानप यांनी देशासाठी प्राणार्पण केले. त्यांचे बलिदान संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी गौरवाची आठवण आहे. भारतीय जवान देशाच्या सीमारेषांवर रात्रंदिवस सज्ज असून त्यांच्या त्यागामुळेच देशात शांतता आणि विकास नांदतो, हे विसरता कामा नये. शहीद सुभाष सानप यांच्या बलिदानाचा गौरव करताना उपस्थितांनी अश्रुपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

यावेळी आजी माजी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे बोलताना म्हणाले की, तब्बल ६६ दिवस भारत मातेच्या शुर वीरांनी रात्र दिवस झुंज देऊन आपल्याला कारगील विजय मिळून दिला.२६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस म्हून आज आपण साजरा करत आहोत. आजच्या तरुणांईला यावेळीच्या पराक्रमाची जाणीव होण्यासाठीचा हा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी अभिनेते तथा व्याख्याते विक्रम जगताप म्हणाले, सैनिकांचे पराक्रम आणि त्याग आपले लोक लगेच विसरून जातात.सैनिक आणि त्यांचा त्याग या गोष्टीचे महत्व आपल्या लोकांना जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत जाणीव होणार नाही. आपल्या सीमेवर काम करणाऱ्या प्रत्येक सैनिकाला आपल्या कर्तृत्वाची जाणीव असल्याने तो आपलं कर्तव्य बजावत आहे तो पैशासाठी काम करत नाही. तो देश सेवा करण्याचं ध्येय ठेवूनच आपले कर्तव्य सीमेवर करत असतो असे सांगत त्यांनी आपल्या व्याख्यानातून कारगील युद्धाचा थरार आपल्या शब्दात उपस्थितांना सांगितला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर गळगटे यांनी केले. यावेळी संघटनेचे संघटनेचे अध्यक्ष अंकुश खोटे, जमीर पठाण, संजीव फसले, नवनाथ भगत, श्रीराम माने, हनुमान झगडे, बबन दहिफळे, गोरख काळे, मनीष नरोडे, विष्णू पवार, दिलीप मराठे, दादासाहेब ठोंबरे, संजय गायकवाड आदींनी हा कार्यक्रम घेण्यासाठी परिश्रम घेतले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT